सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
दालन क्र. ६१२, ६ वा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
Email ID :- somnath.lawande@gov.in

**क्र.:- सेवाक-२०२१/ प्र.क्र. ४२ /गृहव्य (का.२४)** **दिनांक :- १३ ऑक्टोबर, २०२५**

**निविदा सूचना**

**सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) येथे १५ झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर घेण्यासाठी सेवासंविदेचा करार करणेबाबत.**

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई येथे एक वर्षाच्या कालावधीसाठी १५ झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर घेण्यासाठी सेवासंविदेचा करार करावयाचा असून, याकरीता निविदेमधील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक व पात्र नोंदणीकृत संस्थांकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

२. मोहोरबंद लिफाफ्यावर " नवीन मोठ्या झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर पुरवठा करण्याबाबत निविदा सन २०२५-२०२६" असे लिहिणे आवश्यक आहे. निविदेच्या अटी व शर्ती विचारात घेऊन प्रतीमाह आकारण्यात येणारे झेरॉक्स मशिन भाड्याचे दर, त्यामध्ये अनुज्ञेय प्रती व त्यांनतरच्या प्रत्येक प्रतींचा दर इ. नमुद करुन तांत्रिक लिफाफा व अतांत्रिक लिफाफा असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे मध्ये कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग ( कार्या. गृहव्य/२४) मंत्रालय, विस्तार इमारत, ६ वा मजला, दालन क्र. ६१२, मुंबई येथे **दि. १३.१०.२०२५ ते दि. १७.१०.२०२५, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** जमा करावेत. त्यानंतर आलेली निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत. दोन लिफाफा पध्दतीने निविदा सादर न केल्यास निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

४. प्राप्त निविदा उघडण्याची तारीख, वेळ निविदाकाराने लिफाफ्यावर नमूद केलेल्या e -mail पत्त्यावर/भ्रमणध्वनी क्रमांकावर कळविण्यात येईल. त्यासाठी लिफाफ्यावर e-mail तसेच भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा, याबाबतची जबाबदारी निविदाकाराची राहील. निविदा मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल. (मंत्रालय प्रवेश नियमानुसार)

**आपला,**

**( सो. ल. लवांडे )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

Scanned with OKEN Scanner

**१. निविदेबाबतच्या अटी व शर्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

१. पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर तात्काळ (२४ तासांच्या आत) ऑल इन वन सुविधेसह पाठपोट प्रती देणारे अद्ययावत नवीन झेरॉक्स मशिन ( ए ३, ड्युप्लेक्स नेटवर्क, हायस्पीड, स्कॅनर, पेन ड्राईव्ह व इंटरनेटशी जोडणी करता येणारे इ. सुविधांयुक्त) विभागात बसविणे आवश्यक आहे. तसेच, सदर मशिन नादुरुस्त झाल्यास मशिन तात्काळ दुरुस्त करण्यासाठी इंजिनीअरची विभागात नेमणूक करणे पुरवठेदारावर बंधनकारक राहील. अन्यथा पुरवठादार संस्थेकडून प्रतिदिन रुपये २०००/- दंड आकारण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत कार्यालयीन कामाच्या दिवशी १ तासापेक्षा जास्त मशिन बंद राहता कामा नये.

२. प्रत्येक महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या ५ तारखेच्या आत देयक कक्ष अधिकारी (का.गृहव्य), सा.प्र.वि. यांच्याकडे सादर करावे.

३. देयकाची रक्कम पुरवठादारास अदा करण्यासाठी पुरवठादाराने अवर सचिव (कार्या. रोखशाखा), सामान्य प्रशासन विभाग, तिसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे बँकेच्या खात्याचा तपशील सादर करणे आवश्यक राहील. सर्व परिपूर्ण माहीतीसह देयके सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

४. निविदा फॉर्मवर निविदाकाराची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

५. विभागातर्फे फक्त झेरॉक्स मशिन ठेवण्यासाठी जागा, वीज व कागद पुरविण्यात येतील.

६. झेरॉक्स मशिनचे टोनर, मशिनची दुरुस्ती व इतर आवर्ती खर्च पुरवठादाराने करावयाचा आहे.

७. प्रिंटींगचा दर्जा उत्तम असणे आवश्यक आहे.

८. प्रसिध्द करण्यात आलेली निविदा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अथवा निविदा मसुद्यामध्ये बदल करण्याचा अधिकार सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना राहील.

९. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि. ०१ डिसेंबर २०१६ मधील मुद्दा क्र. ४.६ नुसार यशस्वी निविदाकाराला सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे कंत्राट मुल्याच्या ३ टक्के इतकी अनामत रक्कम शासन निर्णयात नमूद केल्यानुसार १५ दिवसांच्या आत जमा करणे बंधनकारक राहील. अन्यथा, सामान्य प्रशासन विभाग निकालाची अधिसूचना रद्द करु शकेल. तसेच, सदर उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि. ०१ डिसेंबर २०१६ मधील मुद्दा क्र. ४.६ मधील अनामत रक्कमेसंदर्भातील तरतूदी लागू राहातील.

१०.संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे आवश्यक असून, त्या संबंधीचा कागदोपत्री पुरावा सादर करणे बंधनकारक आहे. नोंदणीकृत संस्थांची कार्यालये मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे महानगरपालिका किंवा नवी मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीत असेल, अशा निविदाकारास प्राधान्य दिले जाईल .

११.निविदाकाराने तांत्रिक व वाणिज्यिक निविदांमधील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित निविदाकाराची निविदा रद्द करण्यात येईल.

१२.प्रसिध्द करण्यात आलेली निविदा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अथवा निविदा मसुद्यामध्ये बदल करण्याचा अधिकार सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना राहील.

Scanned with OKEN Scanner

१३.कराराच्या अनुषंगाने यशस्वी निविदाकार व सामान्य प्रशासन विभाग यांच्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास ते मुंबई शहर येथील न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी व खर्च सबंधित संस्थेचा राहील.

१४.निवड झालेल्या निविदाकार संस्थेने करार करण्यास नकार दिल्यास तसेच, करारातील अटींचे उल्लंघन केल्यास सदर संस्था अपात्र ठरवण्यात येवून संस्थेची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संस्थेवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१५.यशस्वी निविदाकार संस्थेस विभागाशी असलेला करार संपल्यानंतरही पुढील दर करार होईपर्यंत निविदा सूचनेमध्ये नमूद सर्व अटी व शर्ती नुसार स्विकृत दराने सेवा उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

१६.निविदा मसुद्याचे सूक्ष्म अवलोकन करून परिपूर्ण निविदा सादर करण्याची दक्षता निविदाकाराने घ्यावी.

१७.निविदा स्वीकृत होणाऱ्या पुरवठादारास निविदा सूचनेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतची लेखी हमी तसेच, कोणत्याही विभागातर्फे काळ्या यादीमध्ये नाव समाविष्ट नसल्याच्या हमीसह रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे बंधनकारक असेल.

**२. अस्विकृती:-**

१) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथील अधिकारी/कर्मचा-यांचे नातेसंबंधातील जवळच्या नातेवाईकांना या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. सदर प्रयोजनासाठी जवळच्या नातेवाईकांची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे: -

(अ) हिंदू अविभक्त कुटुंबाचे सदस्य

(ब) त्यांचे पती किंवा पत्नी

(क) वडील, आई, मुलगा, सून, मुलगी, जावई, भाऊ, बहिण, यांच्याप्रमाणे संबंधित असलेले

२) ज्या निविदाकार संस्थेची यापूर्वी शासकीय/निमशासकीय/सहकारी संस्था यांना सेवा पुरविण्याकरीता निवड केली होती, अशा निविदाकार संस्थेविरोधात कोणतीही तक्रार संबंधित कार्यालयास प्राप्त झाली होती व त्या तक्रारीत तथ्य असेल अथवा त्या तक्रारीचे रितसर निवारण झालेले नसेल, अशा निविदाकार संस्थेला या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. तसेच अशा निविदाकाराची अन्य संस्था असल्यास त्या संस्थेला किंवा त्या कंत्राटदाराच्या जवळच्या नातेवाईकाची वा भागीदाराची अन्य संस्था असेल तर अशा संस्थेला किंवा कंत्राटदाराला निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही.

**३. बयाणा रक्कम (EMD):-**

१) निविदा स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने रु. १९,०००/- इतकी बयाणा रक्कम (EMD) (धनाकर्षाच्या स्वरुपात) तांत्रिक लिफाफ्यासह जमा करणे आवश्यक आहे.

२) निविदा प्रक्रिया अंतिम झाल्यानंतर, निविदा स्वीकृत न झालेल्या इतर निविदाकारांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

३) यशस्वी निविदाकाराच्या बाबतीत उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि. ०१ डिसेंबर, २०१६ मधील मुद्दा क्र. ४.६ नुसार सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे कंत्राट मुल्याच्या ३ टक्के इतकी अनामत रक्कम शासन निर्णयात नमूद केल्यानुसार १५ दिवसांच्या आत जमा करणे बंधनकारक राहील. अन्यथा, सामान्य प्रशासन विभाग निकालाची अधिसूचना रद्द करु शकेल. देय असणारी अनामत रक्कम भरल्यानंतर बयाणा रक्कम परत दिली जाईल. यशस्वी निविदाकाराने निर्धारीत कालावधीत अनामत रक्कम भरली नाही किंवा कराराचा भंग केल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

४) बयाणा रक्कमेवर (EMD) कोणतेही व्याज देय असणार नाही.

## ४. <u>अनामत रक्कम (Security Deposit): -</u>

१) यशस्वी निविदाकाराच्या बाबतीत उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि. ०१ डिसेंबर, २०१६ मधील मुद्दा क्र. ४.६ नुसार सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे कंत्राट मुल्याच्या ३ टक्के इतकी अनामत रक्कम १५ दिवसांच्या आत शासन निर्णयात नमूद प्रकारे/स्वरुपात जमा करणे बंधनकारक राहील. निविदाकाराने करारातील अटी व शर्तींचा भंग केल्यास सदरची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२) या कराराच्या किंवा अन्य कराराच्या अटीनुसार कंत्राटदाराकडून देय असलेली सर्व नुकसान भरपाई किंवा इतर रकमा या अनामत रकमेमधून वजा केल्या जातील.

३) अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

४) करार संपल्यानंतर ९० दिवसांच्या मुदतीत निविदाकारास अनामत रक्कम परत दिली जाईल.

Scanned with OKEN Scanner

५. निविदा दोन लिफाफे (TWO BID) पद्धतीनुसार स्विकारली जाईल:-

अ) लिफाफा क्र.१:- तांत्रिक दरपत्रक (फॉर्म-अ)

(तांत्रिक लिफाफ्यात खालील कागदापत्रांच्या प्रमाणित प्रती जोडाव्यात/ऑनलाईन सादर कराव्यात.)

| अ.क्र. | बाब |
|---|---|
| १. | संस्थेचे नाव, संस्थेचा पूर्ण पत्ता, संस्थेचा नोंदणी क्रमांक, संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधीचे नाव व मोबाईल क्रमांक व संस्थेचा कार्यालयीन ई-मेल आयडी याबाबतची माहिती . (संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असल्याबाबत पुरावा सोबत जोडण्यात यावा. उदा. विद्युत देयके/ दुरध्वनी देयके/ कर भरणा केल्याबाबतची पावती/ उद्योग आधार प्रमाणपत्र इ. |
| २. | संबंधित संस्था ही खालीलपैकी किमान एका कायद्यांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.)<br>दुकाने व संस्था अधिनियम १९४८ /कंपनी नोंदणी अधिनियम/सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम, २००६/ दुकाने व आस्थापना अधिनियम, २०१७/उद्यम आधार नोंदणी इ. म्हणून नोंदणी केलेल्याची छायांकित प्रत सोबत जोडण्यात यावी. निविदा सादर करण्याच्या तारखेस संस्थेची नोंदणी झाल्यापासून किमान ५ वर्षे झालेली असावी. |
| ३. | मागील ३ वर्षांच्या कालावधीत किमान २ शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये समाधानकारकरीत्या मनुष्यबळ पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. |
| ४. | आयकर नोंदणी क्रमांक (PAN Card/ TAN Card) छायांकित प्रत. तसेच, संस्थेच्या नावाने लगतच्या तीन आर्थिक वर्षाच्या कालावधीचे आयकर भरल्याच्या कागदपत्रांच्या प्रतींची छायांकित प्रत सोबत जोडण्यात याव्यात. |
| ५. | वैध वस्तू व सेवाकर नोंदणी (GST Registration) प्रमाणपत्र तसेच, लगतच्या ३ महिन्यांचा वस्तू व सेवाकर (GST) भरल्याच्या पावतीच्या छायांकित प्रती सोबत जोडण्यात याव्यात. |
| ६. | बयाणा रक्कम आणि निविदा प्रपत्र फी भरल्याची पावती सोबत जोडण्यात यावी. बयाणा रक्कम व निविदा शुल्क भरण्याच्या अटीतून सूट देण्यात आली असल्यास, त्याअनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्र सादर करण्यात यावे. |
| ७. | निविदेच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असल्याबाबत तसेच, कोणत्याही<br>विभागातर्फे काळ्या यादीमध्ये समावेश नसल्याबाबत हमी पत्र निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या निविदाकाराने<br>स्वाक्षरी व रबरी शिक्का मारुन सोबत जोडावे. |
| १. | संस्थेचे नाव, संस्थेचा पूर्ण पत्ता, संस्थेचा नोंदणी क्रमांक, संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधीचे नाव व मोबाईल क्रमांक व संस्थेचा कार्यालयीन ई-मेल आयडी याबाबतची माहिती . (संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असल्याबाबत पुरावा सोबत जोडण्यात यावा. उदा. विद्युत देयके/ दुरध्वनी देयके/ कर भरणा केल्याबाबतची पावती/ उद्योग आधार प्रमाणपत्र इ. |
| २. | संबंधित संस्था ही खालीलपैकी किमान एका कायद्यांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.)<br>दुकाने व संस्था अधिनियम १९४८ /कंपनी नोंदणी अधिनियम/सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम, २००६/ दुकाने व आस्थापना अधिनियम, २०१७/उद्यम आधार नोंदणी इ. म्हणून नोंदणी केलेल्याची छायांकित प्रत सोबत जोडण्यात यावी. निविदा सादर करण्याच्या तारखेस संस्थेची नोंदणी झाल्यापासून किमान ५ वर्षे झालेली असावी. |
| ३. | मागील ३ वर्षांच्या कालावधीत किमान २ शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये समाधानकारकरीत्या मनुष्यबळ पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. |

- उपरोक्त दस्तऐवजाची निविदाकार संस्था पुर्तता करीत नसल्यास, खरेदी समिती नोंद घेईल आणि त्या निविदाकार संस्थेचा लिफाफा क्र. २ पुढील कार्यवाहीसाठी विचारात

Scanned with OKEN Scanner

- घेण्यात येणार नाही. तांत्रिक निविदा तपासणीनंतर पात्र असल्याचे आढळून आलेल्या निविदाकार संस्थेची वाणिज्यक निविदा लिफाफा उघडण्यात येईल.
- तांत्रिक निविदा उघडल्यानंतर त्यांची छाननी करुन पात्र व अपात्र उमेदवार ठरविण्यात येतील. अपात्र उमेदवारांच्या निविदा ऑनलाईन नाकारण्यात येतील व त्यांची बयाणा रक्कम (EMD) परत करण्यात येईल.

ठिकाण :-

दिनांक :-

**निविदाकार संस्थेचे नाव, स्वाक्षरी व शिक्का**

Scanned with OKEN Scanner

लिफाफा क्र. २ :-अतांत्रिक वित्तीय दरपत्रक (फॉर्म ब)

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) येथे खालील तक्ता क्र. १ येथे दर्शविल्याप्रमाणे झेरॉक्स मशिनची आवश्यकता आहे. त्यानुसार निविदाकार संस्थेने तक्त्या क्र. २ येथील वित्तीय दरपत्रकात झेरॉक्स मशिनच्या भाड्याचे दर नमूद करावे.

तक्त्या क्र.१

विभागासाठी लागणा-या १५ झेरॉक्स मशिनचे विवरण

| अ.क्र. | मशिनची क्षमता | नग | Specification | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ट्रे संख्या | प्रिंटिंग व कॉपिंग | नेटवर्क | पेपर साईज |
| २. | ४० -६०प्रति /मिनिट (ppm) | १५ | २ ट्रे | ड्युप्लेक्स (Both Side) | नेटवर्क जोडणी असणारे | A-३/ A-४/ Legal |

तक्त्या क्र. २

वित्तीय दरपत्रक

| अ.क्र. | मशिनची क्षमता | नग | प्रतिमाह मशिनचे भाडे दर (रु.) | मासिक भाड्यात अनुज्ञेय असलेल्या प्रती | त्यांनतर काढलेल्या प्रत्येक प्रतीचा दर (रु.) | GST (रु.) | एकुण रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४०-६० प्रति/मिनिट (ppm) | १ | | | | | |

दिनांक- ऑक्टोबर, २०२५
ठिकाण – मुंबई

निविदाकार संस्थेचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

Scanned with OKEN Scanner